निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०७/२०१५/ 00939 दिनांक- ०८.०५.२०१५

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/०७/२०१५

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे**

| | |
|---|---|
| अपीलकर्ता | श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय,<br>२/७, किशोर कुंज को.ऑप.सोसायटी,<br>कालवर्टस कंपनीच्या समोर,<br>शांतीपथ मार्ग, माझगांव,<br>मुंबई - ४०० ०१० |
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | १९.०२.२०१५ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | २२.०४.२०१५ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | ०७.०४.२०१५ |

**मागितलेली माहिती**

a. Details of all action taken to rectify the above fault in report and recovery of each of the losses.
b. Name of the officials who committed the each of the above faults.
c. Civil and criminal proceedings initiated against the erring officials.
d. Provision of law and materials relied upon to not to take any action in spite of losses of more 1500 crores till this day.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर**

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. मविनिआ/माअअ/२३/२०१५/०००६० दि.२२.०४.२०१५ नुसार अपिलार्थी यांना दिलेली माहिती येणे प्रमाणे -

For determination of Annual Revenue Requirement (ARR) of generation companies and licensees in the state of Maharashtra, the Commission has notified following Regulations:

1) Maharashtra Electricity Regulatory Commission (Terms and Conditions of Tariff) Regulations, 2005.

2) Maharashtra Electricity Regulatory Commission (Multi Year Tariff) Regulation, 2011 and its amendments.
Above, said Regulations and their amendments are available on Commissions website in downloadable format. In accordance with above Regulation the Commission has issued following Tariff Orders pertains to BEST, which are available in downloadable form on MERC website www.merc.gov.in or www.mereindia.org.in.

| Sr.No | Case No. | Date |
|---|---|---|
| 1 | 26 of 2013 | 28.08.2013 |
| 2 | 171 of 2011 | 16.05.2012 |
| 3 | 150 of 2011 | 30.11.2011 |
| 4 | 95 of 2009 | 12.09.2010 |
| 5 | 118 of 2008 | 15.06.2009 |
| 6 | 73 of 2007 | 06.06.2008 |
| 7 | 696 of 2006 | 03.04.2007 |
| 8 | 4 of 2004 | 09.03.2006 & 25.02.2006 |

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण-**

a. No reply and no info.
b. Stringent action of departmental enquiry, penalty, against the concerned officials who have disobeyed the direction of low under the provision of RTI Act and service rules.

**आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत)-**

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. ०५.०५.२०१५ रोजी दुपारी २.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले.

माहिती अधिकाराच्या अर्जावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहिती अधिकाराचा अर्ज माहिती अधिकारी यांना दि. १९.०२.२०१५ रोजी प्राप्त झालेला असून त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०४.२०१५ रोजी अपिलार्थी यांना उत्तर/माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपील हे दि.०७.०४.२०१५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झालेले आहे यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार/अपिलार्थी यांना माहिती विहित मुदतीच्या नंतर प्राप्त झालेली आहे. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध झाल्यानंतरही अपिलार्थी हे दि. ०५.०५.२०१५ रोजी अपिलाच्या सुनावणीस हजर झालेले आहेत.

वरील अपीलावर दि.०५.०५.२०१५ रोजी अपिलार्थी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही असे सांगीतले. करिता माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचे निवेदन ग्राहय धरुन व अपिलातील उपस्थित मुददे व मागीतलेली माहिती या सर्व बाबींवर विचार करुन वरिल अपील ही गुणवत्तेवर निकाली काढण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकारांतर्गत मागितलेली माहिती ही विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१ व ८४ अंतर्गत माहिती उपलब्ध करुन मागीतलेली आहे. वरील माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी अपिलार्थी यांनी त्यांना अभिप्रेत असलेले दस्ताऐवज यांचा कुठेही उल्लेख केल्याचे दिसून येत नाही. करिता माहिती जन अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या संबंधाने पुरविलेली माहिती योग्य आहे व त्यांनी पारित केलेला आदेश कायम ठेवण्यात येत आहे करिता सदरहु अपिल निकाली काढण्यात येत आहेत.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(अनिलकुमार उके)
उपसंचालक (विधी) तथा
प्रथम अपीलीय अधिकारी.

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ, यांना माहितीसाठी.